**नियमीत दिवाणी दावा क्र. १३/२०१६**
**मुश्तकीम हद्दादी वि. मुजफर हद्दादी**

## निशाणी क्र. ४६ कडील आदेश

प्रस्तूतचा अर्ज वादीने खरेदीखताची प्रमाणित प्रत दुय्यम पुरावा म्हणुन सादर करण्यासाठी परवानगी मिळण्याकरीता दाखल केली आहे. अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की, वादीने दावा मिळकतीबाबत करण्यात आलेले मुळ खरेदीखत दाखल करण्यासाठी निशाणी क्र. ४६ कडे अर्ज दाखल केला होता. प्रतिवादीने सदरचे खरेदीखत सादर करावे असा न्यायालयाने आदेश पारीत केल्यानंतर प्रतिवादीने निशाणी क्र. ४५ कडे प्रतिवादी परदेशी असल्यामुळे त्यांचे मुळ खरेदीखत दाखल करणे शक्य होत नाही अशी पुरशिस दाखल केली आहे. याकारणास्तव वादीने प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्याची मागणी केली आहे. प्रतिवादीने आपले म्हणणे दाखल केले. प्रस्तुतचा अर्ज खोटा व खोडसाळपणे दाखल करण्यात आला असुन अर्जाच्या पृष्ठात प्रतिज्ञापत्र सादर करण्यात आले नाही. त्यामुळे अर्ज फेटाळण्यात यावा अशी मागणी केली आहे.

२. वादी व प्रतिवादी यांच्या विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला. निशाणी क्र. ४४ कडे प्रतिवादीने मुळ खरेदीखत सादर करण्याबाबत आदेश पारीत केल्यानंतर प्रतिवादीने निशाणी क्र. ४५ कडे पुरशिस दाखल करुन प्रतिवादी परदेशी असून मुळ खरेदीखत त्यांनी ठेवले आहे. त्यामुळे सदरचे खरेदीखत न्यायालयाकडे दाखल

करण्याचे शक्य नसल्याचे कळविले आहे. अशा परिस्थितीमध्ये वादीने मागणी केल्याप्रमाणे दिनांक २१/०५/२००२ रोजीचे खरेदीखताचा दस्त क्र. ५८४/२००२ ची प्रमाणित प्रत दुय्यम पुरावा म्हणून सादर करण्याकरीता वादीस परवानगी देणे आवश्यक आहे. करिता मी खालील आदेश पारित करतो -

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादीस दिनांक २१/०५/२००२ रोजीचे खरेदीखताचा दस्त क्र. ५८४/२००२ ची प्रमाणित प्रत दुय्यम पुरावा म्हणून सादर करण्याची परवानगी देण्यात येते.

(खुल्या न्यायालयात जाहिर)

SANDEEP G SARODE Digitally signed by SANDEEP G SARODE Date: 2023.04.20 17:40:56 +0530

(सं. गं. सरोदे)

दिनांक : २०/०४/२०२३ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, मुरुड